माहितीचा
अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**
**अपील क्रमांक : ८२/२०१९**

**अपिलार्थी, श्री.संतोष सिताराम जाधव,**
**रा.पिंपळखुटा, पो.आळंदा, ता.बार्शिटाकळी, जि.अकोला**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्रामपंचायत पिंपळखुटा, ता.बार्शिटाकळी, जि.अकोला**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं),**
**पंचायत समिती, बार्शिटाकळी, ता.बार्शिटाकळी, जि.अकोला**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.०३.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **उपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपिलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| **मूळ अर्जाचा दिनांक** | **जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक** | **प्रथम अपीलाचा दिनांक** | **प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक** |
|---|---|---|---|
| १५.१०.२०१८ | -- | २७.११.२०१८ | २०.१२.२०१८ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १५.१०.२०१८** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " पाणीकर, घरकर, पावती बुक झेरॉक्स, बँकेचे पासबुक झेरॉक्स, कॅशबुक झेरॉक्स, दि.०१ जाने २०१० ते दि.१५.१०.२०१८ पर्यंत नमुना क्र.१० झेरॉक्स, नमुना ८-अ झेरॉक्स प्रती " मागितलेली आहे. सदर माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत अपीलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी व्यथित होवून **दिनांक २७.११.२०१८ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे " माहिती मिळाली नाही " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक **२०.१२.२०१८** रोजी सुनावणी घेऊन " जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत पिंपळखुटा यांना सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांनी मागितलेली माहिती दिली नसल्यास विनामुल्य १५ दिवसात देण्यात येवुन अहवाल नस्ती सोबत जतन करुन ठेवण्यात यावा. " असे नमुद करुन आदेश पारीत केले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०८.०१.२०१९ रोजी** " माहिती न मिळाल्यामुळे " असे कारण नमुद करून द्वितीय



राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय
सत्यमेव जयते
अमरावती विभाग, अमरावती

अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक २४.०३.२०२३ रोजी ऑनलाईन सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.पवन भानुदास धाडवे व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्री.आर.एम.चव्हाण हे उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपिलाकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जाचे अनुषंगाने तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशात जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत पिंपळखुटा यांना सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांनी मागितलेली माहिती दिली नसल्यास विनामुल्य १५ दिवसात देण्यात येवुन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता हे माजी सदस्या असून मासिक सुनावणी दरम्यान त्यांना माहिती प्रदान केली असल्याचा दावा केला असला तरी अपिलकर्ता यांचे म्हणण्यानुसार यातील कुठलीही माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही. मात्र संकलीत केलेली संपुर्ण माहिती या क्षणी देखील प्रदान करण्यास कुठलीही अडचण नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. ही बाब लक्षात घेता , विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क व समन्वय साधुन संकलीत केली संपुर्ण माहिती २ आठवड्याच्या आत अपिलकर्ता यांना प्रदान करावी, या निर्देशासह प्रस्तुत अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय
सत्यमेव जयते
अमरावती विभाग, अमरावती

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २४.०३.२०२३**

जावक क्रमांक 2398 दिनांक 04/06/2023